**SUCCESS KEY TEST SERIES**

**प्रथम सत्र परीक्षा (नमूना उत्तरपत्रिका)**

| | | |
|---|---|---|
| **Std: VIII (E.M)** | **Subject: Marathi** | **Time: 2Hrs** |
| **Date :** | **Chapter 1.2 to 1.7** | **Max Marks: 50** |

**विभाग १ : गद्य**

**Q.1 (क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

Ans. 1. अ. i. अजिबात काम करीत नाही.

ii. अजिबात काम करीत नाही.

iii. नुसतं खातात

आ. i. एकमेकांवर अवलंबून असल्याने

ii. सर्वांच्या एकतेमुळे

2. अ. बसा मंडळी, पोटोबा प्रधान आले कि नाही अजून!

आ. जीवनरस मिळाला नाही म्हणून त्यांचे चेहरे बघा कसे सुकून गेले.

इ. आपल्या देशाचं राज्य चालत ते सर्वांच्या एकतेमुळे.

ई. आपण सारे या शरीररूपी राज्याचे सेवक!

3. अ. i. बेअदबी होणे - अपमान होणे

ii. कुरकुर करणे – तक्रार करणे

आ. i. १) , - स्वल्पविराम २) . – पूर्णविराम ३) ! - उद्‌गारवाचक चिन्ह

ii. १) . – पूर्णविराम २) ? - प्रश्नचिन्ह

4. "आपण सारे एक" या नाटिकेमध्ये लेखिका प्रभा बैकर यांनी शरीररूपी राज्यातील सर्वच इंद्रिये परस्परांना अनुकूल व महत्त्वाची असतात. सर्वांनी एकोप्याने राहून परस्परांची काळजी घेतली तर आरोग्य उत्तम राहते, हे या नाटिकेतून सहज सोप्या शब्दांतून लेखिकेने पटवून दिले आहे. पर्यायाने कुटुंब, परिसर, देश यांच्यासाठीही प्रातिनिधिक स्वरूपातील हा पाठ एकात्मतेचा संदेश देतो. या नाटिकेमध्ये शरीर हे एक राज्य आहे जेथे मेंदू हा राजा आणि इतर अवयव हे सेवक आहेत. प्रत्येकाचे काही ना काही काम ठरलेले असून तो ते इमाने इतबारे पार पाडतो. प्रत्येकाने केलेल्या कार्यावर शरीर चालते. वरील उदाहरण हे आपल्या कुटुंबासाठी आणि देशासाठीही लागू होते. कुटुंबातील प्रत्येक सदस्य, आणि देशाचा प्रत्यके नागरिक जेव्हा आपली जबाबदारी योग्य रीतीने पार पडतो तेव्हा त्या कुटुंबाचे आणि देशाचे कार्य सुरळीत चालते. म्हणून शरीराचे , कुटुंबाचे आणि देशाचे राज्य सुरळीत पार पडायचे असेल तर त्यामधील प्रत्येक घटकाने ठरलेले काम, दिलेली जबाबदारी पार पाडणे आणि ऐक्य अबाधित ठेवणे महत्वाचे आहे, असा या वाक्याचा अर्थ आहे.

**(ख) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

Ans. 1. i. रेल्वेचे सगळे डायरेक्टर ii. सर जमशेटजी जीजीभाई

iii. नाना शंकरशेट iv. अनेक इतर नगरशेट

2. i. मुहूर्ताचा दिवस जाहीर करण्यात आला.

ii. पाना-फुलांचे हार, तोरणे, निशाणे लावून आगगाडीचे डबे सजवण्यात आले.

iii. रेल्वेचे सर्व डायरेक्टर , सर जमशेटजी जीजीभाई , नाना शंकरशेट व इतर नगरशेट जामानिमा करून बसले.

iv. बरोबर पाच वाजता आगगाडीने कर्णा फुंकून भकभक, फकफक प्रवासाला सुरूवात केली.

3. अ. i. दुतर्फा ii. माळका

ब. i. प्रारंभ ii. एकतर्फी

4. सर जमशेटजी जीजीभाई व जगन्नाथ नाना शंकरशेठ यांच्या प्रयत्नांमुळे १८५३ मुंबई ते ठाणे ही रेल्वे सुरू झाली. या दोघांना मूळजी जेठा मोरारजी गोकुळदास, आदामाजी परीभाई, डेव्हिड ससून यांनी त्यांना मदत केली. रेल्वेचा पहिला छोटा फाटा मुंबई ते ठाणे पर्यंत एकेरी लोखंडी रुळाचा रास्ता तयार केला. पण या रुळावरून इंग्रज गाडी कसे चालवणार याबद्दल लोकांना उत्कंठा लागली आणि ते साहजिकच आहे कारण ही गाडी इंग्रज कशाच्या साहाय्याने चालणार आहेत याची लोकांना काहीच कल्पना नव्हती म्हणून लोकांना लोखंडी रुळावरून इंग्रज आगगाडी चालवणार याचे आश्चर्य वाटत होते.

**विभाग २ : पद्य**

**Q.2 खालील पदयाच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (8)**

Ans. 1. (अ) कलागुणांच्या क्षितिजावर प्रतिभेची पहाट उगवली , कारण ज्ञानाचे तेज नव्या युगाच्या नभात पसरले.

(आ) कवीच्या मते 'मानवतेचे युग' म्हणजे- भेदाभेद नसलेले युग.

2. (अ) कवीच्या मते व्यक्तिमत्वाच्या प्रयोगशाळेत सुदृढ तन आणि विशाल मन हे गुण रुजतील.

(आ) नवीन स्वप्ने आणि नवीन आशा हि प्रगतीची नवपरिभाषा आहे.

3. 'प्रभात' या कवितेमध्ये कवी किशोर बळी यांनी नव्या पिढीला 'आधुनिक युगात सारे भेदभाव विसरून देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी नव्या वाटा शोधण्याचे' आवाहन करीत आहेत.

आजचे युग हे आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाचे युग आहे. या युगात आमचे तन सुदृढ झाले आहे. तसेच ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्यामुळे आम्ही नव्या विचारांचा स्वीकार केला आहे. हे नवे विचार , नवे आदर्श, नवी मुल्ये इथे रुजली आहेत. आमच्या रगारगात, नसानसात भिनली आहेत. त्यामुळे आमच्या मनात उन्नतीच्या नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. आम्ही देशाच्या प्रगतीची नवनवीन स्वप्ने पाहतो. ज्ञान आणि परिश्रमाच्या जोरावर ती स्वप्ने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. हीच प्रगतीची नवपरिभाषा आहे.

4. 'प्रभात' या कवितेमध्ये कवी किशोर बळी यांनी नव्या पिढीला 'आधुनिक युगात सारे भेदभाव विसरून देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी नव्या वाटा शोधण्याचे' आवाहन करीत आहेत.

कवी म्हणतात कि आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात आमच्या मनात नवे विचार , नवी मुल्ये रुजली आहेत. देशाच्या प्रगतीची नवी स्वप्ने पाहतो, नव्या वाट शोधत राहतो. एकीकडे हे सारे प्रयत्न सुरु असताना दुसरीकडे समाजामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे भेदभाव दिसून येतात. आर्थिक आणि समाजिक विषमता दिसून येते. या गोष्टी माणुसकीच्या, मानवतेच्या विरोधात आहेत, त्यामुळे देशाच्या

प्रगतीच्या मार्गात मोठे अडथळे निर्माण करतात. म्हणून आपण सर्वांनी भेदभाव दूर करून मानवतेच्या युग स्वीकारले तरच आपण आपल्या देशाला प्रगत आणि श्रेष्ठ बनवू शकतो – असा या विधानाचा मला समजलेला अर्थ आहे.

**विभाग ३ : व्याकरण**

**Q.3 (क) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा:** **2**

**(i)** Ans. पणती

**(ii)** Ans. सखा, सोबती

**(ख) खालील शब्दांचे अव्यय ओळखून लिहा.** **2**

**(i)** Ans. केवलप्रयोगी अव्यय

**(ii)** Ans. i. शब्दयोगी अव्यय ii. केवलप्रयोगी अव्यय

**(ग) अचूक शब्द ओळखा :** **2**

**(i)** Ans. क्षितिजावरती

**(ii)** Ans. निसर्गरम्य

**(घ) खालील शब्दांचे वचन बदला:** **2**

**(i)** Ans. वाटा

**(ii)** Ans. ढाली

**(ङ) दिलेल्या वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा** **3**

**(i)** Ans. काळजात लख्ख होणे – मनात भीती दाटून येणे.
वाक्य : काळोख्या रात्री वीज गेल्याने पहारेकऱ्याच्या काळजात लख्ख झाले.

**(ii)** Ans. आतुरतेने वाट पाहणे – मनापासून वाट पाहणे
वाक्य : दहीहंडी उत्सव झाला कि सर्वजण गणपतीबाप्पाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहतात.

**(iii)** Ans. पोटभर मार खाणे – भरपूर मार खाणे
वाक्य : केतकरकाकांच्या झाडाला लागलेल्या कैऱ्या चोरून पाडल्याबद्दल मुलांनी आईकडून पोटभर मार खाल्ला.

**विभाग ४ : उपयोजित लेखन**

**(या विभागातील प्रश्नांची उत्तरे स्वताच्या शब्दात लिहा.)**

**Q.4 (i) खालील जाहिरात वाचा आणि एका विषयावर पत्रलेखन करा.** **5**

**(ii) खलील शब्दांच्या/मुद्दे आधारे कथा तयार करा:** **5**

**(iii) पुढील उतारा वाचून त्यावर पाच प्रश्न तयार करा:** **5**